CNR-MHYA110017262022

**नि.दि.दा.क्र.९९/२०२२**
**दत्ता —वि— नारायण**

## निशाणी क्रमांक ०५ वरील आदेश

(दि.०६/०२/२०२३ रोजी पारीत)

प्रस्तुत अर्ज वादीने दाव्यातील प्रतिवादी यांच्याविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळणेकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ३९, नियम १ व २ अन्वये सादर केलेला आहे. सदर प्रतिवादी यांनी अर्जास नि.क्र.२८, २९ व ३४ अन्वये आपले म्हणणे सादर करुन विरोध दर्शविला.

**२.** उभयतांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ मधील संबंधित तरतुदींचे वाचन केले.

**३.** वादींची हकीगत थोडक्यात अशी आहे की, दावा मिळकत मौजे विडुळ खंड—१ ता. उमरखेड जि. यवतमाळ येथील शेत स.नं.५/१, क्षेत्रफळ ०० हेक्टर ४२ आर आकार रुपये २.०० पैसे भोगवटदार वर्ग—१ असून त्याची चतु :सिमा दाव्यामध्ये नमूदप्रमाणे ही मिळकत मुळतः वामन नारायण संगेवार याची होती. वामन नारायण संगवोर यांनी वादीस नोंदणीकृत दत्तक पत्राने दि.११.०२. १९८१ रोजी दत्तक घेतले. वामन नारायण संगेवार यांनी नोदंणीकृत दत्तक पत्राने सदर मिळकत वादी यांच्या नावे केली व तेव्हापासून दावा मिळकत वादीच्या मालकी ताब्यातील व वहीतीत आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी कोणताही अधिकार नसतांना दिनांक ०६.०६.२०२२ रोजी तलाठी यांच्या संगनमताने अवैधरित्या फेरफार क्रमांक २२२८ ने त्याच्या नावाची नोंद महसुल दप्तरी दावा मिळकतीस करुन घेतली. तेव्हापासून प्रतिवादी क्र.१ वादीच्या शांततामय कब्जेवहीवाटीस हरकत अडथळा करीत असून दावा प्रलंबीत असतांना प्रतिवादी क्र.१ने बक्षीसपत्राद्वारे मिळकत प्रतिवादी क्र.२ याच्या नावे केली आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी वादीच्या दावा मिळकतीवरील

ताब्यास हरकत अडथळा करु नये व मिळकतीवर ति—हाईत हक्क प्रस्थापीत करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम देण्याची विनंती केली.

४. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी म्हणणे मध्ये वादीचा मिळकतीशी कोणताही संबंध नसून खोटे व बेकायदेशीर बनावट पत्र असल्याचा बचाव घेतला. वाद मृत्यूपत्राचा अमंल महसुल दप्तरी कधीही झाला नसल्याचा बचाव घेतला. प्रतिवादींनी पुढे बचाव घेतला की, मृत्यूपत्र मुदतबाहय आहे. वादी यांची कधीही मालकी व ताबा नव्हता. पुर्वीपासून प्रतिवादी याचा मिळतीवर ताबा आहे. प्रतिवादी क्र.१यांनी प्रेमापोटी मिळकत प्रतिवादी क्र.२ यांना नोंदणीकृत बक्षीसपत्राने बक्षीस दिली आहे. वादी याने दोन भिन्न नावांनी दावा दाखल असल्याने असा दावा न्यायालयापुढे चालू शकत नाही. दावा मिळकतीवरील ख—या मालकांविरुध्द त्यांच्या अधिकारावर गदा आणून मनाई हुकुम वादीस मागता येणार नाही. दावा मिळकतीचे बाजारभाव वाढल्याने प्रतिवादी यांना ब्लॅकमेल करण्याकरीता वादीने प्रस्तुस दावा दाखल केला आहे. वादीची प्रथमदर्शनी बाजू नाही, न्यायाचा समतोल प्रतिवादीच्या बाजुने झुकलेला आहे आणि मनाई हुकुम दिल्यास प्रतिवादीचे अतोनात नुकसान होईल अर्ज नांमजूर करण्याची प्रतिवादीने विनंती केली.

५. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, म्हणणे व अभिलेखाची पाहणी केली. उभयतांच्या कथनांचा व युक्तीवादांचा विचार करता खालील वादप्रश्न निर्माण होत असून त्यावरील निष्कर्ष पुढीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | वादीस सकृतदर्शनी केस असल्याचे त्यांनी शाबीत केले आहे काय ? | **होकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| २) | न्यायाचा समतोल वादीचे लाभात असल्याचे त्यांनी शाबीत केले आहे काय ? | **होकारार्थी** |
| ३) | तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे त्यांनी शाबीत केले आहे काय ? | **होकारार्थी** |
| ४) | आदेश ? | **अर्ज अंशत: मंजुर करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

**६.** वादी यांनी आपला दावा प्रथमदर्शनी सिद्ध करण्याकरीता पुढील कागदपत्रांवर आपली भिस्त ठेवली.

| **अ.क्र.** | **दस्ततऐवज.** |
|---|---|
| ०१. | दत्तकपत्राची सत्यप्रत. |
| ०२. | मृत्यूपत्राची सत्यप्रत |
| ०३. | गांव नमुना—६ क्रमांक २२२८ |

**७.** प्रतिवादींनी आपल्या कथनांची भिस्त पुढील कागदपत्रांवर ठेवली.

| **अ.क्र.** | **दस्ततऐवज.** |
|---|---|
| ०१. | सातबारा उतारा शेत सर्व्हे नंबर ५/१चा सातबारा उतारे सन १९७९—८०, १९८६—८७ ची प्रमाणीत प्रत. |
| ०२. | मौजे विडुळ—१ शेत सर्व्हे नंबर ५/१चा सातबारा उतारे सन १९७७—७८, १९९७—९८ ची प्रमाणीत प्रत. |
| ०३. | मौजे विडुळ—१ शेत सर्व्हे नंबर ५/१चा सातबारा उतारे सन ९८—९९, २००७—२००८ ची प्रमाणीत प्रत. |
| ०४. | सातबारा उतारा सन २००८—२००९ ते २०१४ ते २०१५ |
| ०५. | दि.मु.नं.१५/२०१८ मधील नि.क्र.०१ ची नक्कल. |
| ०६. | दि.मु.नं.१५/२०१८ मधील नि.क्र.१३ ची नक्कल. |

| | |
|---|---|
| ०७. | दि.मु.नं.१५/२०१८ मधील नि.क्र.२९ ची नक्कल. |
| ०८. | दि.मु.नं.१५/२०१८ मधील नि.क्र.३२ ची नक्कल. |
| ०९. | दि.मु.नं.१५/२०१८ मधील नि.क्र.३० ची नक्कल. |
| १०. | दि.मु.नं.१५/२०१८ मधील नि.क्र.३१ ची नक्कल. |
| ११. | सतबारा उतारा शेत स.नं.१०/१अ |
| १२ | फेरफार क्रमांक ५०७ |
| १३ | दत्तात्रय हिंगमिरे यांच्या आधारकार्डची झेरॉक्स प्रत. |
| १४. | बॅंक खात्याची झेरॉक्स प्रत |
| १५. | निवडणूक यादी झेराक्स प्रत. |
| १६ | ग्रामपंचायत कार्यालय यांच्याकडील अहवाल |
| १७ | पोलीस पाटील यांचा अहवाल. |
| १८ | शिधापत्रीकेबाबत अहवाल. |
| १९ | निवडणुक अधिकारी यांच्याकडील नोंद |
| २० | निवडणुक अधिकारी यांच्याकडील नोंद |
| २१ | विज बील |
| २२ | स.नं.५/१ ची पिक तक्ता नोंद सन १९६५—६६ |
| २३ | स.नं.५/१ ची पिक तक्ता नोंद सन १९७६—७७ |
| २४ | स.नं.५/१ ची पिक तक्ता नोंद सन १९७७—७८ |
| २५ | स.नं.५/१ ची पिक तक्ता नोंद सन १९७८—७९ |
| २६ | फेरफार नक्कल |
| २७ | सातबारा उतारा |
| २८ | गावनमुना आठ—अ |
| २९ | स.नं.५/१ सातबारा उतारा |
| ३० | बक्षीसपत्र |
| ३१ | महादेव कोत्तेवार यांचे शपथपत्र |
| ३२ | राजेश हिंगमिरे यांचे शपथपत्र |
| ३३ | योगेश काचरडे यांचे शपथपत्र |

**वादप्रश्न क. १ करिता :—**

८. वादींचा अर्ज हा तात्पुरत्या मनाई हुकुमाकामी असल्यामुळे प्रथमत: वादीस प्रथम दर्शनी केस असल्याचे वादीने सिद्ध करणे आवश्यक आहे. प्रथमदर्शनी केस म्हणजे वादी यांनी संपुर्ण दावाच याटप्प्याला सिद्ध करण्याची आवश्यकता नसुन वादींनी उपस्थित केलेल्या वाद प्रश्नामध्ये न्यायालयाकडून न्यायनिर्णयाद्वारे उत्तर मिळणेकामी आवश्यक असलेला प्रश्न असणे म्हणजे प्रथमदर्शनी केस आहे असे म्हणता येईल.

९. वादीनी प्रथमदर्शनी दावा असल्याचे सिध्द करण्याकरीता दावा मिळकतीमध्ये त्याला असलेला हक्क आणि दावा मिळकतीवर त्याचा असलेला ताबा प्रथमदर्शनी सिध्द करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी यांचया कथनाप्रमाणे वामन नारायण संगेवार यांनी वादीस दत्तक घेतले होते. ही बाब सिध्द करण्याकरीता वादीने प्रकरणामध्ये नोंदणीकृत दस्त क्रमांक ४/१५२/१९८१ दाखल केला आहे. त्याचे अवलोकन केले असता सदर दस्त नोदणीकृत असून त्यामध्ये वामन नारायण संगेवार यांनी वादी यास दत्तक घेतल्याबाबत कथन आहे यावरुन प्रथमदर्शनी नारायण संगेवार यांनी वादी यास दत्तक घेतल्याचे सिध्द होते. प्रतिवादी यांनी दत्तक पत्र बेकायदेशीर असल्याचे कथन केले परंतु ती बाब नोंदणीकृत दस्ताच्या अनुषंगाने प्रकरणाच्या या टप्प्यास विना पुरावा निष्कर्षीत करता येणार नाही.

१०. वादीचे पुढे कथन की त्यास दावा मिळकती वामन नारायण संगेवार यांचया मृत्यूपत्राने मिळाली आहे ही बाब सिध्द करण्याकरीता वादीने वामन संगेवार यांचे दिनांक ११.२.१९८१ रोजीचे नोदंणीकृत मृत्यूपत्राची प्रमाणीत प्रती दाखल केली आहे. सदर नोदंणीकृत मृत्यूपत्रामध्ये वामन संगेवार यांच्या मृत्यूनंतर मिळकत वादी यांना प्राप्त होईल असे नमूद आहे दोन्ही बाजुंनी ही बाब विवादीत केली नाही की, वामन संगेवार यांचा मृत्यू झालेला नाही यावरुन

प्रथमदर्शनी दावा मिळकतीमध्ये वामन संगेवार यांच्या मृत्यूनंतर मृत्यूपत्राने वादी मालक झााल्याचे प्रथम दर्शनी सिध्द होते. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे मृत्यूपत्र बनावट आहे परंतु नोदणीकृत मृत्यूपत्रास प्रतिवादीने कोठेही आव्हान केले नाही.

११. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे त्यास प्रस्तुत दावा मिळकतीमध्ये फेरफार क्रमांक २२२८नुसार मालकी प्राप्त झाली आहे. फेरफार क्रमांक २२२८ चे अवलोकान केले असता दत्ता संगेवार म्हणजे वादी यांनी करुन दिलेल्या अनोंदणीकृत हक्कसोड पत्रान्वये मालकी प्राप्त झाली आहे. या ठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी हा वादी याच्या नावाबाबत हरकत नोंदवित आहे. परंतु या ठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, वादीच्याच नावाने असलेल्या अनोदंणीकृत हक्कसोडपत्रावरुन प्रतिवादी मालकी दाखवत आहे.

१२. वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही पूर्वीपासून त्याच्या ताब्यात आहे या विरुध्द प्रतिवादी याच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत पूर्वीपासून त्याच्या ताब्यामध्ये आहे. दावामिळकत ही शेतजमीन असून शेतजमीनीचा ताबा या टप्प्यला प्रथदर्शनी सिध्द करण्याकरीता पिकपेरणीच्या अनुषंगाने असलेले दस्तऐवज तपासून पाहणे आवश्यक ठरते. अभिलेखावर प्रतिवादी यांनी दावा मिळकतीची सातबारा व पिकाची नोंदवही हे दस्त दाखलकेले आहे. सदर दस्ताची पाहणी केली असता दावा मिळकत ही सन १९७९ पासून रामा नाराायण संगेवार व दत्ता वामन संगेवार याच्या नावाची नोंद आहे. परंतु पिकांची नोंदवहीमध्ये रामा नारायण संगेवार व सन १९९२ पासून प्रतिवादी क्र.१ च्या नावाची नोंद आहे. सदरची नोंद सन २००९—२०१० पर्यंत असल्याचे दिसून येते. वादी याच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत त्याच्या कब्जेवहीवाटीत आहे ही बाब सिध्द करण्याकरीता सन २०१० नंतर दावा मिळकत त्याच्या ताब्यात कशी आली हे दर्शविण्याकरीता त्याने कोणताही दस्तऐवज दाखल केलेला नाही. यावरुन दावा

मिळकत ही प्रतिवादी याच्या ताब्यात असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते.

**१३.** प्रतिवादी यांचे विधिज्ञ यांनी युक्तीवाद करतांना आपली भिस्त मा. सर्वोच्च न्यायालय यांच्याकडील ***Anathula Sudhakar Vs P.Buchi Reddy(Dead), reported in AIR 2008 SC 2033*** या न्यायनिर्णयावर ठेवली. सदर न्यायनिर्णयाचे वाचन केले असता त्यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे निष्कर्श नोंदविलेला आहे.

> 11/3) Where the plaintiff is in possession, but his title to the property is in dispute, or under a cloud, or where the defendant asserts title thereto and there is also a threat of dispossession from defendant, the plaintiff will have to sue for declaration of title and the consequential relief of injunction. Where the title of plaintiff is under a cloud or in dispute and he is not in possession or not able to establish possession, necessarily the plaintiff will have to file a suit for declaration, possession and injunction.

प्रस्तुत न्यायनिर्णय व त्यामधील निष्कर्ष प्रतिवादीस या टप्प्यास उपयुक्त ठरत नाही कारण वादीच्या कथनांप्रामणे त्याचा दावा मिळकतीवर मालकी व ताबा आहे आणि त्यामुळे सदर न्यायनिर्णय व त्यामधील निष्कर्ष प्रतिवादीस या ठिकाणी उपयुक्त ठरत नाही.

**१४.** वादी याच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी दावा मिळकतीवरील त्याच्या ताब्यास हरकत अडथळा करीत आहे. परंतु दावा मिळकतीवर वादीचा ताबा असल्याचे सिध्द करण्यास वादी यास अपयश आले आहे. त्यामुळे त्या अनुषंगाने मनाई हुकुम वादी पात्र ठरत नाही. वादी याने प्रथमदर्शनी ही बाब सिध्द

केली आहे की, दावा मिळकतीमध्ये त्याचा हक्क आहे. वादी याचे नांव दावा मिळकतीचे महसुल दप्तरी मालकी सदरात असतांना कोणत्याही नोंदणीकृत दस्ताअन्वये अथवा मालमत्ता हस्तातरंण कायदयाच्या तरतुदीनुसार दावा मिळकतीचे हस्तांतरण झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. महसुल दप्तरी करण्यात येणा—या नोंदी यावरुन मालकी ठरत नाही. सदरहू नोंदी या महसुल जमा करण्याकरीता करण्यात आलेल्या नोंदी समजण्यात येतात. ही बाब विवादीत नाही की, प्रतिवादी क्र.१ याने बक्षीसपत्रामुळे सदर दावा मिळकत प्रतिवादी क्र.०२ यास हस्तांतरीत केली आहे. अशा परिस्थितीत दावा मिळकतीमध्ये यापुढे ति—हाईत हक्क प्रस्थापीत झाल्यास निश्चितच गुंतागुंत वाढण्याची शक्यता निर्माण होईल आणि त्यामुळे वादी यास प्रथमदर्शनी दावा असल्याचे वादी सिध्द करतो त्यामुळे वादी दावा मिळकतीमध्ये ति—हाईत हक्क प्रस्थपीत करु नये या अनुषंगाने मनाई हुकुम मिळविण्यास पात्रा ठरतो. त्यामुळे मी मुददा क्र.०१ ला होकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**<u>वादप्रश्न क्र.२ करिता</u> :—**

**१५.** प्रस्तुत वादप्रश्नात समाविष्ट असलेला घटक न्यायाचा समतोल (*Balance of convenience)* म्हणजे तुलनात्मक अपाय अथवा पक्षकारांची होणारी गैरसाय होय. न्यायाचा समतोल कोणाच्या बाजूने आहे हे निश्चित करण्यासाठी अंतरिम मनाई हुकूमाचा अर्ज नामंजूर केल्यास अर्जदारास किती अपाय होईल या बाबीसह सदर अर्ज मंजूर केल्यास सामनेवाल्यास किती अपाय होईल या बाबीचा देखिल विचार करणे आवश्यक असते. वादींनी दावा मिळकतीमध्ये हक्क असल्याचे सिध्द केल्याने दाव्यामध्ये न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने असल्याचे दिसुन येतो. सबब वादप्रश्न क्र.२ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**वादप्रश्न क्र. ३ करिता :—**

**१६.** वादप्रश्न क्र.३ मध्ये समाविष्ट असलेला घटक अपरिमित नुकसान (*Irreparable loss)* म्हणजे पैशाने कधीही भरून न येणारी हानी होय. जाणीवपूर्वक पुन्हा उल्लेख करावासा वाटतो की, वादींनी दावा मिळकतीवर हक्क असल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध केल्याने वादींची विनंती मान्य न केल्यास निश्चितच वादींचे तुलनात्मक दृष्टया जास्त अपरिमीत नुकसान होण्याची शक्यता निर्माण होईल. मनाई हुकुम मंजुर न केल्यास दाव्यामध्ये व त्या अनुषंगाने परिस्थितीमध्ये गुंतागुंत वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, वादप्रश्न क्र.३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**वादप्रश्न क्र. ४ करिता :—**

**१७.** सकृतदर्शनी केस *(Prima facie case)* न्यायाचा समतोल *(Balance of convenience)* आणि अपरिमित नुकसान *(Irreparable loss)* या तिन्ही संज्ञा केवळ अंलकारिक भाषेचा नमुना नसून सदर तिन्ही संज्ञांना विशिष्ट महत्व आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये सदर तिन्ही संज्ञा वादीच्या लाभात असल्याचे शाबीत करण्यास त्यांना यश आलेले आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजुर होण्याच्या योग्यतेचा आहे. त्यासाठी खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

०१) निशाणी क्र. ५ वरील तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

०२) दाव्यातील प्रतिवादी यांनी दाव्याचा निकाल लागेपावेतो दाव्यातील मालमत्ता जिचे वर्णन मौजे विडुळ, ता. उमरखेड येथील स.नं.५/१ क्षेत्रफळ ००हे.४२आर आकार २.०० पैसे यामध्ये कोणत्याही मार्गाने ति—हाईत हक्क प्रस्थापीत करु

नये असा तात्पुरता मनाई हुकुम पारीत करण्यात येतो.

०३) वादीच्या दावा मिळकतीवरील ताब्यास हरकत अडथळा करु नये ही अर्जामधील विनंती नांमजूर करण्यात येते.

०४) आदेशामध्ये दिलेल्या निष्कर्षांचा मुळ दाव्यामधील गुणदोषावर कोणताही परिणाम होणार नाही याची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी.

Digitally signed by SHAIKH AARISH SHAIFODDIN
Date: 2023.02.07 17:28:18 +0530

उमरखेड
दि.०६/०२/२०२३

**( ए.एस.शेख )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
उमरखेड

**CERTIFICATE**

" I certify that this Order uploaded is a true and correct copy of original signed Order"

| | | |
|---|---|---|
| Order directly dictated on | : | 06/02/2023 |
| Order checked and signed on | : | 06/02/2023 |
| Uploaded by | : | R.R.Warankar, Stenographer (Grade-III) |
| Uploaded on | : | 07/02/2023 |